निवडक महाराष्ट्र

## आईवरून शिव्या दिल्याने हमालाचा खून

**कराड :** भुईंज येथे शनिवारी उघडकीस आलेल्या खूनाला रविवारी वाचा फुटली असून आईला शिव्या दिल्याच्या कारणावरुन त्याच्या दोन सहकाऱ्यांनीच भुईंज येथे हमाली काम करणाऱ्या अनिल कुचेकर याचा खून केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.याप्रकरणी पोलिसांनी रोहित राजू बडवे आणि आशिष मानसिंग शिंदे या दोघांना अटक केली आहे. त्यांना वाई न्यायालयात हजर केले असता, येत्या १ डिसें.पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. शनि.२५ नोव्हें.रोजी सकाळी ७ वा. भुईंज येथील सार्वजनिक पाण्याच्या टाकीजवळ अनिल नामदेव कुचेकर याचा अज्ञातांनी दांडक्याने व दगडाने मारहाण करून खून केल्याची घटना उघडकीस आली होती.

## नागोठणे भाजपतर्फे भारतीय संविधान दिन साजरा

**नागोठणे :** येथील भारतीय जनता पार्टी कार्यालयात भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस आनंद लाड यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी रोहा भाजपा महामंत्री आनंद लाड, नागोठणे विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर शिर्के, जि.प. गण परिषद् अध्यक्ष शेखर गोळे, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, नागोठणे शहर सरचिटणीस तिरथ पोल्सानी, भाजपा शिक्षण सेल अध्यक्ष अशोक अहिरे, भाजपा शिक्षण सेल उपाध्यक्ष धनराज उमाळे, ओबीसी सेल अध्यक्ष अंकुश सुटे, रोहा तालुका भाजपा महिला मोर्चा उपाध्यक्षा अपर्णा सुटे, विभागीय सरचिटणीस सोनाली पडवळ, माजी विभागीय अध्यक्ष मोरेश्वर म्हात्रे, विवेक रावकर, विहार हेंडे, हेमंत लाड, मोहन लाड, जयराम गोरे, चंद्रकांत गोरे, परशुराम वारगुडे, कुशा वारगुडे, पांडू गोरे उपस्थित होते.

# चीनचा धोका ओळखून वेळीच सज्जतेची गरज

## `लोकमान्य सोसायटी`तर्फे आयोजित सन्मान सोहळ्यात डॉ. शेकटकर यांचे आवाहन



**पुणे :** भारतीय लष्कराचे सामर्थ्य व सज्जता लक्षात घेता, त्यांना सीमेवर वा समोरासमोर पराभूत करणे अशक्य आहे. ही परिस्थिती व हतबलता लक्षात घेवून चीन व पाकिस्तान सारखे शत्रू राष्ट्र युद्ध न करता भारताची अंतर्गत सुरक्षा कमकुवत करून व आपल्यात दुफळी माजवून ते त्यांचा हेतू साध्य करू इच्छित आहेत. हा गंभीर धोका नागरिकांनी वेळीच ओळखायला हवा. नागरिकांनी अशा शक्तीं विरोधात सजगता आणि सज्ज राहायला हवे, असे आवाहन लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर (निवृत्त) यांनी केले.

सिक्कीम विश्वविद्यालयाचे कुलगुरू व लेफ्टनेंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर (निवृत्त) यांचा `लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड`तर्फे आयोजित सन्मान सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

### निवृत्तिनंतरही अभ्यासात सातत्य

कार्यक्रमाच्या प्रारंभी `लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड`चे संस्थापक अध्यक्ष किरण ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शेकटकर हे देशासाठीचे समर्पित योद्धा असल्याचे सांगत, निवृत्तिनंतरही आपल्या अभ्यासात सातत्य राखत, या वयातही संशोधन कार्य पूर्ण करीत तीन डॉक्टरेट मिळवल्या आहेत. त्यांनी केलेले संशोधन हे काळाच्या पुढचे असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख ठाकूर यांनी यावेळी केला. दरम्यान सामान्य भारतीयांच्या मनात देश व लष्कराविषयी प्रेम, जिव्हाळा, जागरूकता निर्माण करण्याचे कार्य डॉ. शेकटकर करीत असून, त्यांच्या या प्रयत्नांना पाठबळ म्हणून आम्ही एक भरीव रक्कम देवू करत असल्याचे प्रतिपादन ठाकूर यांनी प्रास्ताविकात केले.

रविवार, २६ नोव्हेंबर रोजी नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात लेफ्टनेंट जनरल बी. टी. पंडित (निवृत्त) यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा झाला. पुष्पगुच्छ, सन्मानपत्र आणि भेटवस्तू असे सन्मानाचे स्वरूप होते.

यावेळी व्यासपीठावर ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त), `लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड` संस्थापक अध्यक्ष किरण ठाकूर व उपाध्यक्ष अजित गरगट्टी व पुणे विभागीय प्रमुख सुशील जाधव उपस्थित होते. या सोहळ्याला अनेक माजी लष्करी अधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाकिस्तान, चीन सारखी शत्रू राष्ट्रे आपल्या देशातील वेगळे मते असणाऱ्या लोकांच्या मदतीने कट कारस्थान रचून पैशांच्या बळावर अंतर्गत कायदा सुव्यवस्था परिस्थिती व सुरक्षा कमकुवत करू पाहत आहेत, हा डाव वेळीच ओळखायला हवा असेही डॉ. शेकटकर म्हणाले.

डॉ. शेकटकर यांनी ही रक्कम नाशिक स्थित सेंट्रल हिंदू एज्युकेशन सोसायटीला भोसला मिलिटरी स्कूलच्या नागपूर येथे चक्कीखापा भागात उभा राहत असलेल्या भारतीय प्रशासनिक सेवा पूर्वतयारी प्रशिक्षण वरिष्ठ महाविद्यालयाला मदत म्हणून जाहीर केली. प्रमुख पाहुणे बी. टी. पंडित यांनी आपल्या मनोगतात डॉ. शेकटकर यांच्या कारकिर्दीचा गौरव केला. डॉ. शेकटकर जरी आपल्याला गुरूस्थानी मानत असले तरी ते मला लहान भावासारखे असल्याचे पंडित यांनी सांगितले. महाजन यांनी देखील डॉ. शेकटकर यांच्या लष्करी कारकीर्दीतील आठवणी मांडल्या. ओंकार दीक्षित यांनी सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन केले, तर विभागीय व्यवस्थापक सुशील जाधव यांनी आभार व्यक्त केले.

# गरजू व्यक्तीच्या घराच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्नशील

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

**ठाणे :** स्वतःचे घर असावे, असे प्रत्येकाचे स्वप्न असते, ते चांगल्या दर्जाचे असावे, असे प्रत्येकाचे स्वप्न असते, ते आज पूर्ण होत आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते ४० लाख गरिबांना घरे देणे, त्यातून एसआरए योजना सुरू झाली. याच माध्यमातून प्रत्येक गरजू व्यक्तीचे स्वतःचे घर असण्याची स्वप्नपूर्ती करण्यासाठी हे शासन कटिबध्द आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे येथे केले.

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत अंतिम भूखंड क्रमांक ३७७ मौजे पाचपाखाडी, चंदनवाडी, पाठक इस्टेट, ठाणे .जगन्नाथ (एसआरए) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित येथील झोपडपट्टी लाभार्थ्यांकरिता सदनिकेच्या चाव्यांचे वाटप कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी आमदार निरंजन डावखरे, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे चे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, नरेश म्हस्के व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महानगर प्रदेश प्राधिकरणचे ठाणे कार्यालय स्वतंत्र केल्याने ठाण्यातील गरजूंना लवकर घरे मिळतील. संपूर्ण एमएमआर क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन ही योजना सुरू करण्यात आली आहे.

### जगन्नाथ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांना सदनिकांचे वाटप

मुख्यमंत्री म्हणाले, जगन्नाथ (एसआरए) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या प्रकल्पात ४०० घरे, १०० दुकाने आहेत. याशिवाय व्यायामशाळा, बालवाडी, ग्रंथालय अशा विविध सुविधाही आहेत. या उत्तम दर्जाच्या सुविधांसह उभ्या राहिलेल्या या प्रकल्पाची निगा राहणे, येथील परिसर स्वच्छ ठेवणे, ही येथील सर्वांची जबाबदारी आहे. वातावरण चांगले ठेवले की सर्वच चांगले होते. समरीन ग्रुप ने वेळेत काम पूर्ण केल्याबद्दल या प्रकल्पाचे विकासक मुश्ताक शेख यांचे अभिनंदन करुन मुंबई-ठाणे शहरातील रखडलेल्या इतर प्रकल्पांचेही काम पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जगन्नाथ (एसआरए) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ठाणे या संस्थेच्या सभासदांना प्रातिनिधिक स्वरूपात सदनिकेच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले.

शासनाने लोकांच्या हितासाठी या योजनेतील काही नियमांमध्ये बदल केले. शासनाची महत्वाकांक्षी क्लस्टर योजना ठाण्यात सुरू करण्यात आली असून, १० हजार घरांच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरू करीत आहोत. नियम-कायदे लोकांच्या भल्यासाठी हवेत, हे शासन त्यासाठीच काम करीत आहे. प्रत्येक गरजू व्यक्तीच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी हे शासन प्रयत्नशील आहे.

## LOSS OF SHARE CERTIFICATES

**NOTICE** is hereby given that for the Folio No. of **2703622** for the Equity shares of **PHILIPS INDIA LIMITED** standing in the name(s) of **ARVIND NARMADASHANKAR SHASTRI & BHADRAKUMAR ARVIND SHASTRI & MEENAKSHI BHADRAKUMAR SHASTRI** following share Certificates has/ have been lost or mislaid and undersigned has/ have applied to the Company to issue duplicate Certificate(s) for the said shares.

| Sr. No. | Certificate(s) Nos. | Distinctive Nos. | No. of Shares |
|---|---|---|---|
| 01. | 83358 | 41507061-41507061 | 01 |
| 02. | 136186 | 14231856-14231865 | 10 |
| 03. | 178087 | 18980803-18980817 | 15 |
| 04. | 266749 | 24940512-24940535 | 24 |

Any person who has a claim in respect of the said shares should lodge such claim with the Company at its registered address **3RD FLOOR, TOWER A, DLF IT PARK, 08 BLOCK AF, MAJOR ATERIAL ROAD, NEW TOWN (RAJARHAT), KOLKATA, WEST BENGAL-700156** within 15 days from this date else the Company will proceed to issue duplicate Certificate(s).

Name & Address of Applicant(s):
**DARSHAN BHADRAKUMAR SHASTRI**
B/201 - Prism Enclave Co Op Housing Society, Akurli Road, Lokhandwala Township, Kandivali East, Mumbai 400101.

**Date: 28 /11/ 2023**

## LOSS OF SHARE CERTIFICATES

**NOTICE** is hereby given that for the Folio No. **006779,** Certificate(s) Nos. **6779,** Distinctive Nos. **55911100 to 55911149** for Equity Shares No's **50** of **SIGNIFY INNOVATIONS INDIA LIMITED (Old Name: PHILIPS LIGHTING INDIA LIMITED)** standing in the name(s) of **ARVIND NARMADASHANKAR SHASTRI & BHADRAKUMAR ARVIND SHASTRI & MEENAKSHI BHADRAKUMAR SHASTRI** has/ have been lost or mislaid and undersigned has/ have applied to the Company to issue duplicate Certificate(s) for the said shares. Any person who has a claim in respect of the said shares should lodge such claim with the Company at its registered address **MANGALAM BUSINESS CENTRE, BLOCK B, 6TH FLOOR, 22, CAMAC STREET, KOLKATA, WEST BENGAL - 700016** within 15 days from this date else the Company will proceed to issue duplicate Certificate(s).

Name & Address of Applicant(s):
**DARSHAN BHADRAKUMAR SHASTRI**
B/201 - Prism Enclave Co Op Housing Society, Akurli Road, Lokhandwala Township, Kandivali East, Mumbai 400101.

**Date: 28 /11/ 2023.**

## फॉर्म ए
## जाहीर उद्घोषणा

(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ६ अन्वये)

**सिनेलाईन एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहितीकरीता संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **सिनेलाईन एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख | ०१ मे, २००६ |
| ३ | कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित /नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण | आरओसी - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर / लिमिटेड लायाबिलिटी आयडेन्टिफिकेशन नंबर | यु५१९००एमएच२००६पीटीसी१६१५२२ |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता | १३, श्रीनिकेतन, १६, विठ्ठलभाई रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई महाराष्ट्र ४०००५६ भारत |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी सुरू होण्याची तारीख | २४ नोव्हेंबर २०२३ (२६ नोव्हेंबर २०२३ रोजीस आयआरपीला प्राप्त झाले) |
| ७ | नादारी निर्णय प्रक्रिया समाप्तीची अंदाजित तारीख | २२ मे, २०२४ |
| ८ | अंतरिम निर्णय व्यावसायिक म्हणून कृती करणाऱ्या नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | नाव: श्री निहाल महामूलाल पठाण<br>नो. क्र. आयबीआयबीआय/आयपीए-००१/आयपी-पी/०१५६१/२०१८-१९/१२४०६ |
| ९ | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम निर्णय व्यावसायिकांचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता: प्लॉट क्र. २७, आर. एस. क्र. ८२५, संजीवन परिसर, टीपीएम चर्चजवळ, सर्किट हाऊस जवळ, कोल्हापूर ४१६ ००३ महाराष्ट्र<br>ईमेल-ca.neehal@gamil.com |
| १० | अंतरिम निर्णय व्यावसायिकांशी दळणवळण करण्याकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता: प्लॉट क्र. २७, आर. एस. क्र. ८२५, संजीवन परिसर, टीपीएम चर्चजवळ, सर्किट हाऊस जवळ, कोल्हापूर ४१६ ००३ महाराष्ट्र<br>ईमेल-cirp.cineline@gamil.com |
| ११ | दावे सादर करण्यासाठी अंतिम तारीख | ८ डिसेंबर, २०२३ |
| १२ | अंतरिम निर्णय व्यावसायिकांनी निश्चित केलेले कलम २१ च्या पोट-कलम (६ ए) च्या खंड (बी) अंतर्गत धनकोंचे वर्ग, असल्यास | उपलब्ध नाही |
| १३ | एका वर्गातील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्यासाठी ठरलेल्या नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | उपलब्ध नाही |
| १४ | (ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) प्राधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | वेब लिंक : https://ibbi.gov.in/home/download<br>प्रत्यक्ष पत्ता: उपलब्ध नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण मुंबई खंडपीठ च्या आदेशा द्वारे **सिनेलाईन एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड** च्या कार्पोरेट नादारी निर्णय प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश **२४ नोव्हेंबर, २०२३** रोजी दिला.
**सिनेलाईन एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड** च्या धनकोंना याद्वारे अंतरिम निर्णय व्यावसायिकांकडे बाब क्र. १० समोरील पत्त्यावर **०८ डिसेंबर, २०२३** रोजी किंवा त्यापूर्वी त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करण्यास सांगण्यात येते.
वित्तीय धनकोंनी पुराव्यांसह त्यांचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. अन्य सर्व धनकोंनी पुराव्यांसह त्यांचे दावे व्यक्तिशः, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत.
बाब क्र. १२ सापेक्ष सूचीबद्ध केलेल्या श्रेणीमधील कोणत्याही वित्तीय धनको प्रपत्र सीए मधील वर्ग (शून्य) च्या अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यासाठी बाब क्र. १३ सापेक्ष सूचिबद्ध तीन नादारी व्यवसायकामधून त्यांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करू शकता.
दाव्यांच्या खोटी किंवा दिशाभूल करणारे पुराव्यांच्या सादरीकरण दंडास पात्र असेल.

**श्री निहाल महामूलाल पठाण**
**दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२३** **सिनेलाईन एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड चे अंतरिम निर्णायक व्यावसायिक**
**ठिकाण: कोल्हापूर** नो. क्र. आयबीआयबीआय/आयपीए-००१/आयपी-पी/०१५६१/२०१८-१९/१२४०६

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस हया नोटीसीने कळविण्यात येते की गांव मौजे टोकरे, ता. वसई, जि. पालघर येथील सर्व्हे क्र. ३२/ब, क्षेत्र १५५.१०.०० हे. आर. चौ. मीटर हि जमीन मिळकत श्री. आशुतोष मधुकर जोशी ह्यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असुन श्री. आशुतोष मधुकर जोशी ह्यांनी सदर जमीन मिळकत विकासित करण्याचे ठरविले आहे आणि सदर जागेसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेकडून विकास परवानगी मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे. तरी सदर जमिनी संबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत वा हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत सर्व लेखी कागदोपत्री पुराव्यानीशी खालील पत्त्यावर कळवावे.

दि. २८.११.२०२३ **सही/-**
**श्री. चार्ल्स मॅथ्यु डिमेलो, वकील,**
काऊनिंग ग्लोरी रूमाव आळी, पो. आगाशी विरार (प), जि. पालघर ४०१३०१

## अंनिसने घेतलेल्या राज्यस्तरीय रिल्स स्पर्धेचा निकाल घोषित

**मुंबई :** सोशल मिडिया मधून अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार तरुणांमध्ये पोहोचावा या हेतूने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीमार्फत डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या जन्मदिनानिमित्त राज्यस्तरीय रिल्स स्पर्धा आयोजित केल्या जातात. यंदा या स्पर्धेचे दुसरे वर्ष होते. यंदाच्या स्पर्धेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला आहे. यात डोंबिवली येथील अवधूत यरगोळे यांचा पहिला क्रमांक आला आहे. दुसरा क्रमांक गौरव संभूस (डोंबिवली) व तिसरा क्रमांक कार्तिक हजारे (डोंबिवली) यांचा आला आहे. प्रथम क्रमांकासाठी ₹३०००, पुस्तके व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकासाठी ₹२०००, पुस्तके व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकासाठी ₹१०००, पुस्तके व प्रमाणपत्र अशी बक्षीसे देण्यात येणार आहेत. याशिवाय चांगले व्हिडीओ बनवलेल्या आणखी सात स्पर्धकांना पुस्तके बक्षीस देण्यात येणार आहेत. त्या स्पर्धकांची नावे पुढीलप्रमाणे- बाईमाणूस मीडिया हाऊस (औरंगाबाद), अनघा श्रीगडीवार, सयाजी थोरात (करमाळा), तुषार वाघ (नेवासा) सूरज कृष्णा भोसले (पुणे), अमित निंबाळकर (सुधागड), सुहास गायकवाड (करमाळा).

## जाहीर सूचना

ICICI Home Finance

**नोंदणीकृत कार्यालय:** आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१
**कॉर्पोरेट कार्यालय:** आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, जेबी नगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई- ४०००५९
**शाखा कार्यालय:** २रा मजला, कार्यालय क्र. २०१, सी. एस. क्र. १३६०४/८०, सिद्धिविनायक हाऊस, हॉटेल अॅम्बेसेडर जवळ, सांगली मिरज रोड, सांगली - ४१६४१६
**शाखा कार्यालय :** १ला मजला, इंदिरा हाईट्स, प्रमोद महाजन गार्डन जवळ, डोंगरी वस्तीगृह समोर, जुना गंगापूर नाका, नाशिक - ४२२००५.
**शाखा कार्यालय :** शॉप क्र. ३०१, ३०२, ३०३, ३ रा मजला, नेक्स्ट लेव्हल मॉल, हॉटेल ग्रॅण्ड नेगफिल समोर, कॅम्प रोड, अमरावती - ४४४६०१
**शाखा कार्यालय :** १ ला मजला, ऑफिस क्र. २३, २४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, स क्र. २८३/१, ए, अंतिम प्लॉट क्र. २९, उप प्लॉट क्र. १, राधिका रोड, करंजे तार्फ सातारा ४१५००२
**शाखा कार्यालय:** २रा मजला, २०३, प्लॉट क्र. २, केटी एम्पायर, स्टेट बँक ऑफ इंडियावर, नवघर, वसई (प) ४०१२०२

खालील कर्जदारांनी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (आयसीआयसीआय एचएफसी) बँकेकडून त्यांनी घेतलेल्या कर्ज सुविधेची मुद्दल आणि व्याजाचा परतावा करण्यात कसूर केलेली आहे आणि कर्ज नॉन परफॉर्मिंग अॅसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकृत झाले आहे. खालील नमूद तारखेची सूचना सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये त्यांनी दिलेल्या त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर त्यांना जारी करण्यात आली, तथापि ती न बजावता परत आली म्हणुन त्यांना सदर जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदाराचे नाव/ (कर्ज खाते क्रमांक) आणि पत्ता | तारण मत्तेच्या मिळकतीचा पत्ता/ अंमलबजावणीयोग्य मत्ता | सूचना पाठविल्याची तारीख/ सूचनेच्या तारखेस थकबाकी | एनपीए तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | धर्मवीर नंदकुमार गंभीर (कर्जदार), कुसुम नंदकुमार गंभीर (सहकर्जदार), महावीर नंदकुमार गंभीर (सहकर्जदार), प्राजक्ता धर्मवीर गंभीर (सहकर्जदार), लीना महावीर गंभीर (सहकर्जदार), दत्त मंदिरासमोर, कवठे महांकल सांगली महाराष्ट्र - ४१६४०५ एनएचएसएलआय००००१२६११४० | सीएस क्र. १०८२ १०८७ १०८८ १०८९, शिवाजी चौक मार्केट क्षेत्रामध्ये स्थित, गीता ड्रेसस जवळ, कवठे महांकल सांगली, स.क्र. १०८२ १०८७ १०८८ १०८९ सांगली महाराष्ट्र - ४१६४०५. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: लागू क्र. १०९३, दक्षिण: लागू क्र. १०८५ आणि १०८३, पूर्व: रस्ता, पश्चिम: लागू क्र. १०८६ आणि १०९० | ०९-११-२०२३ रु. ७,९१,२२२/- | ०३-११-२०२३ |
| २. | धर्मवीर नंदकुमार गंभीर (कर्जदार), कुसुम नंदकुमार गंभीर (सहकर्जदार), प्राजक्ता धर्मवीर गंभीर (सहकर्जदार), लीना महावीर गंभीर (सहकर्जदार), महावीर नंदकुमार गंभीर (सहकर्जदार), दत्त मंदिरासमोर, कवठे महांकल सांगली महाराष्ट्र - ४१६४०५ एनएचएसएलआय००००१२६११४२ | सीएस क्र. १०८२ १०८७ १०८८ १०८९, शिवाजी चौक मार्केट क्षेत्रामध्ये स्थित, गीता ड्रेसस जवळ, कवठे महांकल सांगली, स.क्र. १०८२ १०८७ १०८८ १०८९ सांगली महाराष्ट्र - ४१६४०५. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: लागू क्र. १०९३, दक्षिण: लागू क्र. १०८५ आणि १०८३, पूर्व: रस्ता, पश्चिम: लागू क्र. १०८६ आणि १०९० | ०९-११-२०२३ रु. २९,९८,२५२/- | ०३-११-२०२३ |
| ३. | मितेश सुनील खाखरिया (कर्जदार), कृपा मिनेश मजिठिया (सहकर्जदार), फ्लॅट क्र. १०१ रेवा रेसिडेन्सी झवेरी कॉलनी मोटवानी फॅक्टरी रोड नाशिक रोड महाराष्ट्र - ४२२१०१. एलएचएनएएस००००१३७०१४३ | २७, रेसिडेन्सी अपार्टमेंट, देवलाली शिवार, नाशिक रोड, नाशिक ११४ए/२, ११४ए/१बी, नाशिक, महाराष्ट्र - ४२२१०१. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: सीमांत अंतर आणि बी विंग, दक्षिण: प्रवेश मार्ग, पूर्व: फ्लॅट क्र. २८, पश्चिम: फ्लॅट क्र. २६. | १७-११-२०२३ रु. ५१,२८,९१०/- | ०३-११-२०२३ |
| ४. | राजू फकिरा दामोदर (कर्जदार), वंदू कॉलनी जवळ पद्मसर्व कॉलनी, शेगाव रोड अमरावती महाराष्ट्र एलएचएएमआय०००००५०९३०१ | प्लॉट क्र. ९, मोजमापित २६०.२२ चौ.मी. शीट क्र. १२/२/बी भाग, वंदना कॉलनी, शेगाव रोड, सौरभा कॉलनी जवळ, अमरावती, अमरावती, महाराष्ट्र - ४४४६०४. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: सेवा जमीन, दक्षिण: प्लॉट क्र. ८, पूर्व: रस्ता, पश्चिम: प्लॉट क्र. १०. | १८-११-२०२३ रु. ३०,७८,५५०.१८/- | २९-११-२००३ |
| ५. | अरविंद शंकर गायकवाड (कर्जदार), प्रियांका अरविंद गायकवाड (सहकर्जदार), स.क्र. ५८, बीएफ क्र. २, पी. क्र. ९१० साई पुष्पा अपार्टमेंट केसरकर पेठ सातारा महाराष्ट्र ४१५००२. एलएचएसआरए००००१४९५८२७ | फ्लॅट क्र. ५, रेणुका अपार्टमेंट चिमणपुरा पेठ, ता. जिल्हा सातारा, सीएस क्र. ३०, सातारा महाराष्ट्र - ४१५००२. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: इमारतीजवळ मोकळी जागा, दक्षिण: माई सदन अपार्टमेंट, पूर्व: रस्ता, पश्चिम: शिवाजी माने मिळकत | १८-११-२०२३ रु. २२,५३,४१९/- | ०८-११-२०२३ |
| ६. | अरविंद शंकर गायकवाड (कर्जदार), प्रियांका अरविंद गायकवाड (सहकर्जदार), स.क्र. ५८, बीएफ क्र. २, पी. क्र. ९१० साई पुष्पा अपार्टमेंट केसरकर पेठ सातारा महाराष्ट्र ४१५००२. एलएचएसआरए००००१४९५८२९ | फ्लॅट क्र. ५, रेणुका अपार्टमेंट चिमणपुरा पेठ, ता. जिल्हा सातारा, सीएस क्र. ३०, सातारा महाराष्ट्र - ४१५००२. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: इमारतीजवळ मोकळी जागा, दक्षिण: माई सदन अपार्टमेंट, पूर्व: रस्ता, पश्चिम: शिवाजी माने मिळकत | १८-११-२०२३ रु. ७७,८५६.२४/- | ०८-११-२०२३ |
| ७. | गायकवाड अरविंद शंकर (कर्जदार), गायकवाड प्रियांका अरविंद (सहकर्जदार), फ्लॅट क्र. २ पी क्र. ९१० सर्वे क्र. ५८ बी साईपुष्पा अपार्टमेंट केसरकर पेठ सातारा महाराष्ट्र - ४१५००२. एलएचएसआरए००००१५०५९८७ | फ्लॅट क्र. ६, रेणुका अपार्टमेंट चिमणपुरा पेठ, ता. जिल्हा सातारा, सीएस क्र. ३०, सातारा महाराष्ट्र - ४१५००२. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: इमारतीजवळ मोकळी जागा, दक्षिण: माई सदन अपार्टमेंट, पूर्व: रस्ता, पश्चिम: शिवाजी माने मिळकत | १८-११-२०२३ रु. २२,७४,८३९/- | ०८-११-२०२३ |
| ८. | गायकवाड अरविंद शंकर (कर्जदार), गायकवाड प्रियांका अरविंद (सहकर्जदार), फ्लॅट क्र. २ पी क्र. ९१० सर्वे क्र. ५८ बी साईपुष्पा अपार्टमेंट केसरकर पेठ सातारा महाराष्ट्र - ४१५००२. एलएचएसआरए००००१५०५९८९ | फ्लॅट क्र. ६, रेणुका अपार्टमेंट चिमणपुरा पेठ, ता. जिल्हा सातारा, सीएस क्र. ३०, सातारा महाराष्ट्र - ४१५००२. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: इमारतीजवळ मोकळी जागा, दक्षिण: माई सदन अपार्टमेंट, पूर्व: रस्ता, पश्चिम: शिवाजी माने मिळकत | १८-११-२०२३ रु. ६६,३३९.८२/- | ०८-११-२०२३ |
| ९. | मधुसूदन नायर (कर्जदार), सुहासिनी नायर (सहकर्जदार), फ्लॅट क्र. १० मनोर रोड स्वागत अपार्टमेंट, आगरी पाडा जवळ पालघर पश्चिम पालघर महाराष्ट्र ४०१४०४. एलएचव्हीआरआर००००१२६८६७६ | १०६, पहिला मजला पी-१ प्रकार बी, क्रिस्टल पार्क पालघर पश्चिम ८२/४ पालघर महाराष्ट्र - ४०१४०४. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: निवासी इमारत, दक्षिण: निवासी इमारत, पूर्व: खुला, पश्चिम: रस्ता. | २०-११-२०२३ रु. २५,२१,६५६/- | ०३-११-२०२३ |
| १०. | मधुसूदन नायर (कर्जदार), सुहासिनी नायर (सहकर्जदार), फ्लॅट क्र. १० मनोर रोड स्वागत अपार्टमेंट, आगरी पाडा जवळ पालघर पश्चिम पालघर महाराष्ट्र. एनएचव्हीआरआर००००१२६८६८६ | १०६, पहिला मजला पी-१ प्रकार बी, क्रिस्टल पार्क पालघर पश्चिम ८२/४ पालघर महाराष्ट्र - ४०१४०४. सीमाबद्ध द्वारे : उत्तर: निवासी इमारत, दक्षिण: निवासी इमारत, पूर्व: खुला, पश्चिम: रस्ता. | २०-११-२०२३ रु. ७८,१४५/- | ०३-११-२०२३ |

पर्यायी बजावणीकरिता पावले उचलण्यात आली आहेत. वरील कर्जदार आणि/किंवा त्याचे हमीदार (प्रयोज्य तेथे) यांना सदर सूचना प्रसिद्धी तारखेपासून ६० दिवसात थकबाकी रक्कम अदा करण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे कसूर केल्यास सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनन्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ च्या तरतुदीं अन्वये पुढील पावले उचलण्यात येतील.

**दिनांक : नोव्हेंबर २८, २०२३** **प्राधिकृत अधिकारी**
**ठिकाण: सांगली, नाशिक, अमरावती, सातारा, पालघर** **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, वेलसन टेक्सकेम प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून तालुका वाडा, जिल्हा पालघर व्हिलेज उसरचा गट क्र. २७७/१ आणि गट क्र. ४६९/१ धारक, यानंतर एकत्रितरित्या ''सदर मिळकती'' असा उल्लेख, खालील परिशिष्टात अधिक सविस्तरपणे वर्णिलेल्या कृषि जमिनीच्या प्लॉट्सचे विक्रीच्या मार्गाने सर्व त्यांचे हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध संपादन करण्यास माझे अशील इच्छुक आहेत.

सर्व व्यक्तींना सदर मिळकती किंवा त्याच्या कोणताही भागामध्ये किंवा त्यावर विक्री, हस्तांतर, अभिहस्तांकन, अदलाबदल, प्रभार, भार, कुळवहिवाट, पोट-कुळवहिवाट, भाडेपट्टा, पोट भाडेपट्टा, परवाना, गहाण, वारसा, भेट, धारणाधिकार, देखभाल, अंत्यदान, सुविधाधिकार, विश्वस्त, करारनामा, कब्जा किंवा याशिवाय कसेहीच्या मार्गे कोणताही शेअर, अधिकार, नामाधिकार, मत्ता, हितसंबंध, दावा किंवा मागणी काही असल्यास लिखित स्वरुपात आमच्या कार्यालयात आमच्या नावे संबंधीत कागदपत्रीय पुराव्यांसह खालील नमूद पत्त्यावर सदर सूचनेच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कळविणे, कसूर केल्यास कोणतेही दावे, हक्क, हितसंबंध यांच्या संदर्भाशिवाय आमचे अशिल प्रस्तावित व्यवहार पूर्ण करतील आणि कोणतेही दावे, हक्क, हितसंबंध, जर असल्यास, परित्यागीत आणि रद्द समजण्यात येईल.

''सदर मिळकती''चे परिशिष्ट

(पहिला प्लॉट)

तालुका वाडा, जिल्हा पालघर, व्हिलेज उसर, ग्रामपंचायत उसर स्थित गट क्र. २७७/१ धारक मोजमापित ०-३९-० (एच.ए.) धारक जमिनीच्या कृषि जमिनीच्या प्लॉटचा सर्व तो तुकडा आणि पार्सल. सीमाबध्दता खालीलप्रमाणे :-

**उत्तर** किंवा त्या दिशेने : कु. करूणा सदाशिव सोनावणे यांचा गट क्र. ४६९ समाविष्टित जमिनीच्या प्लॉटचा तुकडा आणि पार्सल.

**दक्षिण** किंवा त्या दिशेने : गट क्र. २७६ समाविष्टित जमिनीचा प्लॉट.

**पूर्व** किंवा त्या दिशेने : उसर कोल-टेरेड रोडपर्यंत विस्तारलेला मोहत्याचा पाडा.

**पश्चिम** किंवा त्या दिशेने : गट क्र. २७६ समाविष्टित श्री. काशिनाथ काळू पाटील यांच्या जमिनीचा प्लॉट.

(दुसरा प्लॉट)

तालुका वाडा, जिल्हा पालघर, व्हिलेज उसर, ग्रामपंचायत उसर स्थित गट क्र. ४६९/१ धारक मोजमापित ०-२०-० (एच.ए.) धारक मालकी जमिनीच्या कृषि प्लॉटचा सर्व तो तुकडा आणि पार्सल. सीमाबध्दता खालीलप्रमाणे :-

**उत्तर** किंवा त्या दिशेने : श्री. सीताराम जाऊ दुबेला यांचा गट क्र. ४६९ समाविष्टित उर्वरित जमिनीच्या प्लॉटचा तुकडा आणि पार्सल.

**दक्षिण** किंवा त्या दिशेने : श्री. सीताराम जाऊ दुबेला यांचा श्री. सदाशिव तुकाराम सोनावणे यांना विकलेला गट क्र. २७७ समाविष्टित जमिनीचा प्लॉट.

**पूर्व** किंवा त्या दिशेने : उसर गावाचा कोल-टेरेड रोड.

**पश्चिम** किंवा त्या दिशेने : गट क्र. २७६ समाविष्टित श्री. काशीनाथ पाटील यांचा जमिनीचा प्लॉट.

दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजीस
**कल्पेश जोशी असोसिएट्स**
**वकील**
बेहरामजी मॅन्शन, ४ था मजला, काश्मिर एम्पोरियम, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई ४००००१

## फॉर्म बी
## जाहीर उद्घोषणा

(द इन्सॉल्व्हन्सी अॅन्ड बँक्रप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स २०१६ च्या रेग्युलेशन १२)

**मिडियामॅन इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या स्टेकहोल्डर्सच्या माहितीसाठी**

| अ. क्र. | वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **मिडियामॅन इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख | ११/११/१९९६ |
| ३ | कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/ नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण | आरओसी - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/कॉर्पोरेट कर्जदाराना लिमिटेड लायबिलीटी आयडेंटिफिकेशन क्र. | यु७२२००एमएच१९९६पीएलसी१०३९०० |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता | फ्लॅट क्र. १०४, इमारत क्र. २, बी विंग, संकल्प सीएचएसएल, मानस हॉटेल जवळ, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५९ |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी प्रक्रिया बंद होण्याची तारीख | ९-११-२०२३ |
| ७ | नादारी निर्णय प्रक्रिया सुरू होण्याची तारीख | १०-११-२०२३ (परिसमापन आदेश परिसमापकाद्वारे अपलोड/प्राप्त २४-११-२०२३ रोजीस झाला) |
| ८ | परिसमापक म्हणून कृती करणारे नादारक व्यवसायिक नाव आणि नोंदणीकृत क्रमांक | श्री. भास्कर गोपाळ शेट्टी<br>रजि. क्र. आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०१२८५/२०१८-१९/१२००३ |
| ९ | मंडळात नोंदणीकृत असलेला समापकाचा पत्ता आणि इमेल | सी - ७७, शांती शॉपिंग सेंटर, मीरा रोड पूर्व-४०११०७, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र.<br>ईमेल : cabgshetty@gmail.com |
| १० | समापकासह पत्रव्यवहार करण्यासाठी असलेला पत्ता आणि इ-मेल | सी - ७७, शांती शॉपिंग सेंटर, मीरा रोड पूर्व-४०११०७, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र.<br>ईमेल : mediaman.liquidation@gmail.com |
| ११ | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | २७-१२-२०२३ |

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, सन्माननिय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, बेंच १ मुंबई ने दि. १०-११-२०२३ रोजी **मिडियामॅन इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड** च्या विरोधात कलम ३३ अंतर्ग, नादारी प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे. सदर आदेश २४-११-२०२३ रोजी अपलोड/प्राप्त झाला.
**मिडियामॅन इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड** च्या स्टेकहोल्डर्सना बाब क्र. १० च्या समोरील पत्त्यावर परिसमापकांकडे **२७-१२-२०२३** रोजी किंवा पूर्वी त्यांचे दावे सादर करण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे.
वित्तीय धनकोंनी त्यांच्या पुरावेसहित दावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. सर्व इतर धनकों, व्यक्तिशः, टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या पुरावेसहित दावे सादर करू शकतात.
**चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.**

**दिनांक: नोव्हेंबर २८-११-२०२३** परिसमापकाचे नाव आणि सही
**ठिकाण: मुंबई** श्री. भास्कर गोपाळ शेट्टी
रजि. क्र. आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०१२८५/२०१८-१९/१२००३
परिसमापक
**मिडियामॅन इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड** च्या संदर्भात

## जाहीर सूचना

**मयत एडायालील राजेंद्र नायर यांचे एकमेव हयात असलेले 'कायदेशीर वारसदार असलेले** माझे अशील, **भागीरथी राजेंद्रन नायर आणि कु. रोशनी राजेंद्रन नायर** यांच्या वतीने सूचना देण्यात येत आहे की, जे खालील परिशिष्टामध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या **संपूर्ण फ्लॅटच्या जागेच्या संदर्भात मयत व्यक्तींचे शेअर्स वारसा मिळण्याचा हक्कदार आहेत.** ("सदर फ्लॅट" असेही म्हटले जाईल).

सर्व व्यक्तींस सदर फ्लॅटमध्ये किंवा विरोधात किंवा कोणत्याही भागासंबंधित किंवा समाविष्टीत वारसा, मृत्यूपत्र, उत्तराधिकार, मृत्युपत्रीत दान, गहाण, ताबा, विक्री, हस्तांतरण, भेट, देवाणघेवाण, भाडेपट्टा, धारणाधिकार, प्रभार, भाडेकरार, विश्वस्त, परवाना, देखभाल, सुविधाधिकार किंवा अन्य काही कश्याहीच्या मार्गे कोणत्याही कराराद्वारे, लेखन, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, खटला, हुकूम किंवा न्यायालयीन आदेश किंवा अन्यथा कायद्याद्वारे किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचे असल्यास, च्या मार्गे कोणताही दावा, हक्क, नामाधिकार, हितसंबंध, हिस्सा, मागणी, आक्षेप असल्यास, खाली दिलेल्या पत्त्यावर, अशा दाव्यांच्या समर्थनीय कागदोपत्री अश्या दाव्यांच्या पुराव्यांसह अधोस्वाक्षरीकारांना सदर सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १४ दिवस (चौदा) दिवसांच्या कालावधीत लेखी कळवावे लागेल, कसूर केल्यास, असा कोणताही कथित दावा किंवा हितसंबंध माफ केले गेले आहेत आणि सर्व हेतू आणि उद्दिष्टांसाठी सोडले गेले आहेत असे मानले जाईल आणि आमच्या अशीलांवर बंधनकारक नसतील.

परिशिष्ट

गाव नाहूर, प्रभाग "टी", एलबीएस मार्ग, मुलुंड (प.), मुंबई-४०००८० मधील सीटीएस क्र. ५४४ आणि ५४४/१ धारक जमीनीच्या प्लॉटवर बांधकामित प्रकल्प, पूर्वी "रुनवाल इन्फिनिटी" म्हणून ओळखला जाणारा, सध्या "दि सॅन्कच्युरी" म्हणून ओळखला जाणारा मधील इमारत क्र. बी २ (टॉवर-३ म्हणूनही ओळखले जाणारा) मधील ८व्या मजल्यावर स्थित फ्लॅट क्र.- ८०१ धारक क्षेत्र मोजमापित १०५८ चौ. फू. चटई क्षेत्रफळ.

दिनांकित २८ नोव्हेंबर, २०२३.
**सही/-**
**प्रसाद वाघ**
**वकील, उच्च न्यायालय**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the Public at large that the Original Agreement for Sale dated 24th February 2000, executed between Shri Venu Gopal, Proprietor of M/s. We Developers and Shri Joseph Leo Naidu and Shri Sunil Joseph Naidu (The Purchasers) for the property bearing addressed at Flat No. 101, admeasuring about 1,215 sq. ft., Super built-up area on 1st Floor, Vinu Veena Building, Plot No. 10, Village Sarsole, Nerul, Navi Mumbai, has been lost/misplaced. Missing Report bearing No. 2265/2023 has been registered with Naupada Police Station, Thane.
The Public at large is hereby informed not to deal or carry out any transaction with anyone for the abovementioned property and if anyone finds the document kindly inform at the below address.

**Sd/-**
**Pravin J. Naidu**
Address: 206, Ashtavinayak Kripa Society, Bhakti Mandir Road Near Swarup Enclave, Naupada, Thane West - 400602.
**Date:** 28-11-2023 **Place:** Thane